POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

गणपती बाप्पा मोरया



मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-२७ ● मुंबई, शुक्रवार, २९ ऑगस्ट २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

# मुंबई महानगरपालिकेचे नागरिकांना आवाहन

## विसर्जनाला चौपाटीवर जाताय...'स्टिंग रे', 'ब्लु जेलीफीश' पासून सावधान...

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक



गिरगाव चौपाटीवर जेलीफिशसदृश विषारी ब्लू बटन जेलीफीश, स्टिंग रे'चा वावर वाढल्यामुळे गणेशमूर्ती विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर मुंबई महानगरपालिकेच्या वतीने मार्गदर्शक सूचना जारी करण्यात आल्या आहेत. दीड दिवसांच्या गणपतीचे आज विसर्जन होणार आहे. या पार्श्वभूमीवर चौपाट्यांवर जाणाऱ्या भाविकांसाठी मुंबई महापालिकेने या सूचना जाहीर केल्या आहेत. गेल्या आठवड्यात कोसळलेला मुसळधार पाऊस आणि समुद्राकडून जमिनीच्या दिशेने वाहणारे वारे यामुळे गिरगाव चौपाटीवर जेलीफिशसदृश विषारी ब्लू बॉटलचा वावर वाढला आहे. दरवर्षी याच सुमारास मुंबईमधील समुद्रकिनाऱ्यांवर ब्लू बॉटल दृष्टीस पडत असून अनेक पर्यटकांना त्यांनी दंश केल्याच्या घटना घडल्या आहेत. त्यामुळे मुंबई महापालिकेच्यावतीने मत्स्यव्यवसाय विभागाला विचारणा करण्यात आली होती. त्यानुसार, मत्स्यव्यवसाय विभागाने गणेशमूर्ती विसर्जनादरम्यान मुंबई येथील समुद्रात ऑगस्ट ते ऑक्टोबर या कालावधीमध्ये ब्लू बटन जेलीफीश, स्टिंग रे प्रजातीच्या माशांचा वावर असतो आणि नागरिकांना मत्स्यदंश होऊ शकतो. यापासून बचावासाठी उपाययोजना करावी, अशी विनंती मुंबई महानगरपालिकेला केली होती. मुंबई येथील किनारपट्टी एक संरक्षित किनारपट्टी असून या किनारपट्टीला वेगवान पाण्याचा प्रवाह नाही. त्यामुळे जेलीफिशसारख्या जलचरांसाठी येथे मुबलक प्रमाणात प्लवंगसदृश खाद्य तयार होते. त्यामुळे या कालावधीत ब्ल्यू बटन जेली सारख्या जलचरांचे संगोपन व संवर्धन होते. याबरोबर सर्व किनारपट्टीवर कमी पाण्याचा प्रवाह किंवा संरक्षितपणा असल्यामुळे या किनारपट्टीच्या वालुकामय क्षेत्रामध्ये स्टींग रे (पाकट) याचेही संवर्धन व संगोपन होत असते. त्यामुळे मुंबईकर नागरिक व पर्यटकांनी समुद्रकिनारी जाताना महापालिकेने जाहीर केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करावे, असे आवाहन मुंबई महानगरपालिका प्रशासनाने केले आहे.

**अशी घ्या काळजी...**

- गणेश विसर्जन मुंबई महानगरपालिकेच्या वतीने नेमणूक करण्यात आलेल्या जीवरक्षक व यंत्रणेमार्फत करावे.
- विसर्जनादरम्यान गणेश भक्तांनी उघड्या अंगाने समुद्रात प्रवेश करू नये,) पायाला मत्स्यदंश होऊ नये म्हणून गमबुटांचा वापर करावा.

**मत्स्यदंश आणि प्रथमोपचार**

मस्त्यदंशाची घटना घडल्यास चौपाटी परिसरात वैद्यकीय कक्ष सज्ज ठेवण्यात आला आहे. तसेच एक १०८ रूग्णवाहिका काही ठिकाणी तैनात करण्यात आली आहे. याशिवाय, नागरिकांनी पुढील काळजी घ्यावी.

- ह्यस्टींग रेह्मने दंश केलेल्या जागी आग किंवा चटका लागल्याचा अनुभव येतो. जेलीफिशच्या दंशामुळे फार मोठ्या प्रमाणात खाज सुटते.
- जखम चोळली किंवा चोळून चिघळली जाणार नाही, याची खबरदारी घ्यावी.
- मत्स्यदंश झालेली जखम स्वच्छ पाण्याने धुवून काढावी.
- जखम झालेल्या जागी बर्फ लावावा.

## धोकादायक पुलांवर मिरवणुकीदरम्यान काळजी घ्या, बीएमसीचे आवाहन





**मुंबई :** मुंबईतील विविध धोकादायक १२ पुलांवरून श्रीगणेशाची मिरवणूक काळजीपूर्वक न्यावी, असे आवाहन मुंबई महापालिकेतर्फे गणेश मंडळांना करण्यात आले आहे. मुंबई महापालिका कार्यक्षेत्रातील मध्य आणि पश्चिम रेल्वे मार्गावरील १२ पूल धोकादायक स्वरुपाचे आहेत. काही पुलांच्या दुरुस्तीची कामे सुरू आहेत. तर, काही पुलांची कामे पावसाळ्यानंतर सुरू करण्यात येणार आहेत. त्यामुळे गणेशभक्तांनी श्रीगणेशाचे आगमन-विसर्जनाच्या मिरवणुकीदरम्यान या पुलांवरून जाताना विशेष काळजी घ्यावी. याबाबत मुंबई महापालिका व मुंबई पोलीस यांच्या वतीने वेळोवेळी करण्यात येणाऱ्या सूचना व निर्देशांचे काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहन महापालिका प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

श्रीगणेशाच्या मिरवणुकीत धोकादायक पुलांवरून जाताना पुलावर भक्तांनी जास्त गर्दी केल्यास पुलाला धोका उद्भवू शकतो. त्यामुळे पुलाचे नुकसान होईल अथवा पुलाचा भाग कोसळून मोठी दुर्घटना घडू शकते. परिणामी जीवितहानी होऊ शकते. अथवा मोठ्या प्रमाणात गणेश भक्त जखमी होऊ शकतात. याच अनुषंगाने मुंबई महापालिकेने श्रीगणेशोत्सवात कोणतीही अप्रिय घटना घडू नये, यासाठी पोलिसांनी आणि महापालिकेने अधिक काळजी घेण्यास सांगितले आहे. मध्य रेल्वेवरील घाटकोपर रेल्वे उड्डाणपूल, करी रोड रेल्वे उड्डाणपूल, आर्थर रोड रेल्वे उड्डाणपूल किंवा चिंचपोकळी रेल्वे उड्डाणपूल, भायखळा रेल्वे उड्डाणपुलावरून मिरवणूक नेताना काळजी घ्यावी. तसेच पश्चिम रेल्वे मार्गावरील मरीन लाईन्स रेल्वे उड्डाणपूल, सँडहर्स्ट रोड रेल्वे उड्डाणपूल (ग्रॅन्ट रोड व चर्नी रोडच्या मध्ये), फ्रेंच रेल्वे उड्डाणपूल (ग्रॅन्ट रोड व चर्नी रोडच्या मध्ये), केनडी रेल्वे उड्डाणपूल (ग्रॅन्ट रोड व चर्नी रोडच्या मध्ये), फॉकलॅन्ड रेल्वे उड्डाणपूल (ग्रॅन्ट रोड व मुंबई सेंट्रलच्या मध्ये), महालक्ष्मी स्टेशन रेल्वे उड्डाणपूल, प्रभादेवी- कॅरोल रेल्वे उड्डाणपूल आणि दादर येथील लोकमान्य टिळक रेल्वे उड्डाणपूल आदींवरून मिरवणूक नेताना काळजी घ्यावी, असे आवाहन महानगरपालिका प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

सदर 12 पुलांवर एकावेळेस अधिक वजन होणार नाही, याची काळजी घ्यावी. या पुलांवर ध्वनिक्षेपकाचा वापर करुन नाचगाणी करण्यात येऊ नये. उत्सवाचा आनंद पुलावरुन खाली उतरल्यावर घ्यावा. पुलावर एका वेळेस भाविकांनी जास्त गर्दी न करता, पुलावर जास्त वेळ न थांबता त्वरित पुलावरुन पुढे जावे, पोलीस व मुंबई पालिका प्रशासनाने दिलेल्या सुचनेनुसार मार्गक्रमण करावे, असे आवाहन महापालिकेकडून करण्यात आले आहे.

### विरार दुर्घटना : मृतांच्या कुटुंबियांना ५ लाखांची मदत जाहीर

## विरारमधील इमारत दुर्घटनेत मृतांचा आकडा वाढला, आतापर्यंत 14 जणांना बाहेर काढण्यात यश

■विरार । प्रतिनिधी,

पालघर जिल्ह्यातील विरार येथे एका चार मजली इमारतीचा भाग कोसळून मोठी दुर्घटना घडली. बुधवारी 27 ऑगस्ट रोजी रात्री 12:05 च्या सुमारास घडलेल्या या हृदयद्रावक घटनेत मृतांचा आकडा आता 15 वर पोहोचला आहे. मृतांमध्ये एका माय-लेकीचाही समावेश आहे. या दुर्घटनेत 9 जण गंभीर जखमी झाली असून बचावकार्य अजूनही युद्धपातळीवर सुरू आहे.

वसई-विरार महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त संजय हिरवडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, या दुर्घटनेत आतापर्यंत 15 जणांचा मृत्यू झाला आहे, तर 9 जखमींवर उपचार सुरू आहेत. रहिवाशांनी दिलेल्या माहितीनुसार अजूनही दोन लोक बेपत्ता असून त्यांचा शोध सुरू आहे.

विरारमधील मोरेगाव येथील रामू कंपाऊंडमधील 'रमाबाई अपार्टमेंट' या इमारतीचा मागील बाजूचा भाग अचानक कोसळला. ही



इमारत 2012 मध्ये बांधली गेली होती, मात्र ती पूर्णपणे बेकायदेशीर होती. घटनेनंतर तातडीने एनडीआरएफ आणि अग्निशमन दलाच्या दोन टीम बचावकायार्साठी घटनास्थळी दाखल झाल्या आहेत. सुरुवातीला अरुंद रस्ता असल्यामुळे मोठ्या मशीन्स घटनास्थळी पोहोचू शकल्या नाहीत. त्यामुळे ढिगारा हाताने काढण्याचे काम सुरू होते. आता मशीन्सची मदत घेऊन काम वेगाने सुरू आहे.

या घटनेनंतर वसई-विरार महानगरपालिकेच्या तक्रारीवरून पोलिसांनी इमारतीच्या बिल्डरला ताब्यात घेतले आहे. या दुर्घटनेत इमारतीच्या 50 फ्लॅटपैकी 12 फ्लॅट असलेला भाग कोसळला.

महानगरपालिकेने स्पष्ट केले आहे की ही इमारत बांधण्यासाठी कोणतीही परवानगी घेतली नव्हती. या दुर्घटनेमुळे अनेक कुटुंबे बेघर झाली आहेत. त्यांना चंदनसर येथील समाजमंदिरात तात्पुरता निवारा देण्यात आला आहे. तिथे त्यांच्यासाठी जेवण, पाणी आणि इतर आवश्यक वस्तूंची व्यवस्था करण्यात आली आहे.

जिल्हा आपत्कालीन व्यवस्थापन अधिकारी विवेकानंद कदम यांनी सांगितले की, ज्या चाळीवर इमारतीचा भाग कोसळला, ती चाळ रिकामी होती. त्यामुळे मोठे नुकसान टळले. आसपासच्या इतर चाळींमधील लोकांनाही सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आले आहे.

विरार भागात एक इमारत कोसळून झालेल्या दुर्घटनेत आतापर्यंत 17 जणांचा मृत्यू झालेला आहे, याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तीव्र दुःख व्यक्त केले आहे. तसेच मृतांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे. या सर्व कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत, असे सांगतानाच मृतांच्या वारसांना 5 लाख रुपयांची मदत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केली आहे.

48 तासांपासून एनडीआरएफच्या मदतीने हे बचाव कार्य राबवले जात आहे आणि ते पुढच्या काही तासात संपेल. आतापर्यंत 9 जणांना सुरक्षित वाचविण्यात आले आहे.

## गणेशमूर्तींचे काम पूर्ण करता आले नसल्याने मूतीर्काराने काढला पळ

■कल्याण । प्रतिनिधी,

गणेशात्सवाच्या एक दिवसा आधी डोंबिवलीतील गणेश मूतीर्कार पळून गेल्याने गणेश भक्तामध्ये प्रचंड नाराजी पसरली आहे. प्रफूल्ल तांबडे असे या मूतीर्काराचे नाव असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत. तर मूतीर्कार प्रफूल्ल तांबडे याच्या विरोधात डोंबिवलीतील विष्णूनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पैसे घेऊन मूतीर्काराने मूर्ती वेळेवर तयार केल्या नाहीत. भक्तांची फसवणूक केली म्हणून हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मोठ्या प्रमाणात गणेश भक्तांनी गणेश मूतीर्चे ऑर्डर दिली होती. सकाळी जेव्हा लोकांना माहिती पडले की मूतीर्कार पळून गेला आहे की, आनंद कला केंद्रात भक्तांनी एकच गर्दी केली. काही प्रमाणात मूर्ती लोक घरी घेऊन गेले. भक्तांची एकच मागणी आहे. मूतीर्काराचा शोध घेऊन त्याच्या विरोधात कारवाई करण्यात यावी. डोंबिवली पश्चिमेतील महात्मा फुले रोडवर चिनार मैदान आहे. या मैदानात आनंदी कला केंद्र हा मूर्ती तयार करण्याचे कारखाना आहे. प्रफूल्ल तांबडे हा कारखाना चालवितो. सोमवारी रात्रीपासून मूतीर्कार प्रफूल्ल तांबडे हा पसार झाला आहे. मंगळवारी सकाळी जेव्हा लोकांना माहिती पडले की, मूतीर्कार पसार झाला आहे. लोकांनी एक गर्दी कारखान्यात केली. ज्याला जी मूर्ती मिळेल ती मूर्ती घेऊन लोक घरी गेले. याची माहिती पोलिसांना मिळताच कारखान्याच्या ठिकाणी पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. नागरिकांकडून संताप व्यक्त केला जात आहे. पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, संध्याकाळी प्रफूल्ल तांबडे हा कारखान्याच्या प्रवेशद्वावर बसून रडत होता. इतक्या ऑर्डर घेतल्या, काम झाले नाही. आता मी काय करु, असे तो काही लोकांना सांगत होता. ज्या लोकांनी पैसे देऊन मूर्ती नोंद केली आहे.

## नरेंद्र मोदी 75 व्या वर्षी राजकारणातून निवृत्त होणार?

### मोहन भागवतांनी स्पष्ट सांगितलं, संघाने आदेश दिला तर...

■नवी दिल्ली। प्रतिनिधी,

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे वयाच्या 75 व्या वषार्नंतर राजकारणात सक्रिय राहणार की निवृत्ती घेणार या चर्चांना अखेर सरसंघचालक मोहन भागवतांनी पूर्णविराम दिला आहे. मी किंवा एखाद्याने 75 व्या वर्षी निवृत्ती घ्यावी असं मी कधीही म्हटलो नाही, संघाने आदेश दिला तर मी निवृत्ती घेईन असं मोहन भागवत म्हणाले. संघाला गरज असेल तोपर्यंत मी कार्यरत राहणार असंही मोहन भागवतांनी स्पष्ट केलं.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे 100 वर्ष पूर्ण झाल्याच्या पार्श्वभूमीवर आयोजित तीन दिवसीय अधिवेशनाचे आयोजन करण्यात आलं होतं. त्याच्या अखेरच्या दिवशी मोहन भागवतांनी उपस्थितांना मार्गदर्शन केलं. मोहन भागवत यांनी यावेळी अनेक महत्त्वाचे मुद्दे मांडले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 75 व्या वाढदिवसानंतर ते राजकारणातून निवृत्त होतील, अशा चर्चांना भागवतांनी स्पष्टपणे फेटाळले.

**भाजपला सल्ला देऊ शकतो**

भाजपबद्दल संघ सगळं ठरवतो यात काहीच तथ्य नाही, असं सरसंघचालक मोहन भागवत यांनी स्पष्ट केलं. आम्ही भाजपला सल्ला देऊ शकतो, पण निर्णयाचा अधिकार पक्षाचाच असल्याचंही त्यांनी सांगितलं. आम्ही निर्णय घेतले असते तर इतका वेळ लागला नसता, असं सूचक वक्तव्यही भागवत यांनी केलं. भाजपचा अध्यक्ष ठरवण्यात संघाची भूमिका आहे का, असा प्रश्न त्यांना विचारण्यात आला होता, त्यावेळी त्यांनी हे स्पष्ट केलं.

**घुसखोरीवर कठोर भूमिका**

घुसखोरीच्या मुद्द्यावर भाष्य करताना भागवत म्हणाले, घुसखोरी थांबवलीच पाहिजे. सरकार प्रयत्न करत आहे, हळूहळू पुढेही जात आहे. पण समाजाने ठरवले पाहिजे की आपल्या देशातील रोजगार आपल्या नागरिकांनाच मिळाला पाहिजे. आपल्या देशात मुस्लिम नागरिक आहेत, त्यांनाही रोजगाराची गरज आहे. पण बाहेरून आलेल्यांना रोजगार का द्यायचा? त्यांनी त्यांच्या देशात काम करायला हवं.



**संघ सांगेल तसा निर्णय घेऊ**

पत्रकारांशी संवाद साधताना मोहन भागवत म्हणाले, मी कधीही असं म्हटलं नाही की 75 वर्षानंतर निवृत्त व्हायलाच पाहिजे. संघ आम्हाला जे सांगेल तेच आम्ही करू. कुणी 80 व्या वर्षी मला शाखेत काम करायला सांगितलं तर ते मला करावं लागेल. निवृत्ती ही वैयक्तिक गोष्ट नाही, तर संघाच्या कायार्शी जोडलेली आहे. मी स्वत:साठी किंवा इतरांसाठी निवृत्तीचा निर्णय दिला नाही. आम्ही कधीही निवृत्त होण्यासाठी तयार आहोत, तसेच संघाला आमची गरज असेपर्यंत काम करण्यासाठीही तयार आहोत.

**मोदींच्या निवृत्तीवर पडदा**

पंतप्रधान मोदी यांच्या 75 व्या वाढदिवसानंतर ते सक्रिय राजकारणातून बाहेर पडतील, या चर्चांना भागवतांच्या विधानानं पूर्णविराम मिळाला आहे. यामुळे मोदींच्या राजकीय कारकिदीर्बाबत स्पष्टता आली आहे.



संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# गणेशोत्सवकाळात मुंबईला अट्टाहासाचे गालबोट

मराठा आरक्षणाचा मुद्दा घेऊन मनोज जरांगे दोन वर्षांपासून लढत आहेत. आता त्यांनी पुन्हा एकदा मुंबईत आंदोलनाचा घाट घातला आहे, त्यासाठीची त्यांनी निवडलेली वेळ मात्र सर्वांनाच खटकत आहे. मनोज जरांगे हे जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी येथून 27 ऑगस्टला निघणार आणि शिवनेरीमार्गे 29 ऑगस्टला मुंबईतील आझाद मैदानात पाऊल ठेवणार, असे त्यांचे नियोजन आहे. 27 तारखेला श्रीगणेशाचे आगमन होत आहे. दहा दिवसांचा हा उत्सवाचा, उत्साहाचा काळ आहे. मुंबईतील जनजीवन विस्कळीत होऊ नये म्हणून आझाद मैदानात आंदोलनाला परवानगी देता येणार नसल्याचे मुंबई उच्च न्यायालयाने म्हटले आहे. ते अगदी खरे आहे. मुंबईतील गणपती उत्सवाबद्दल वेगळं सांगण्याची गरज नाही. राज्यभरातून, देश-विदेशातून येथील गणपती उत्सव पाहण्यासाठी लोक येत असतात. लालबागचा राजाचे केवळ मुखदर्शन व्हावे यासाठी लाखोंची रांग लागते. देशाचे गृहमंत्री अमित शहा उत्सव काळात सुरुवातीचे दोन दिवस मुंबईत मुक्कामाला आहेत. अनेक केंद्रीय मंत्री, उद्योगपती, सेलिब्रिटी गणरायाच्या दर्शनासाठी येत असतात. यामुळे पोलीस यंत्रणेवर प्रचंड ताण असणार आहे.मुंबई आणि राज्यातीलच एकूण सुरक्षा व्यवस्थेचा आढावा मुख्यमंत्री तथा गृहमंत्र्यांनी घेतला. एकट्या मुंबईत 17 हजारांहून अधिक पोलिसांचा फौजफाटा गणपती उत्सवकाळात तैनात असणार आहे. फक्त पोलीसच नाही तर एसआरपीएफ, क्यूआरटी टीम, दंगल नियंत्रण पथक, वाहतूक पोलीस, आरपीएफ प्लाटून, एसआरपीएफ प्लाटून, होमगार्ड अशी विविध पथके या काळात सुरक्षेसाठी तैनात असणार आहेत. एवढी सगळी सुरक्षा यंत्रणा असूनही छोट्या-मोठ्या घटना या होतच असतात. मुंबई हे हायपर सेन्सेटीव्ह शहर आहे. गणरायाच्या उत्सवात अख्खी मुंबई भक्तीरसात दंग झालेली असते. या उत्सवाला गालबोट लागू नये म्हणून हा सगळा बंदोबस्त असतो. यामध्ये मराठा आंदोलकांचा मोर्चा मुंबईत दाखल झाला तर सुरक्षा यंत्रणेवर प्रचंड ताण येण्याची शक्यता आहे. मराठा आरक्षणाचा मुद्दा अतिसंवेदनशील आहे. याआधीची मनोज जरांगे यांची आंदोलने पाहिली, त्यासाठी जमलेला जनसमुदाय पाहिला तर मराठवाड्यासह संपूर्ण महाराष्ट्रातून जर मराठा आरक्षण आंदोलक मुंबई शहरात आझाद मैदानात दाखल झाले तर त्यांच्या सुरक्षेचा, राहण्याचा आणि इतरही अनेक बाबींचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये 2018 मध्ये आंदोलनावेळी काकासाहेब शिंदे या तरुणाने आंदोलन तीव्र झाल्यानंतर गोदावरी नदीत उडी घेतली होती. यामुळे मुंबईतील आंदोलनावेळी सुरक्षा यंत्रणेला डोळ्यात तेल घालून काम करावे लागेल. ऐन गणपती उत्सवकाळात हे आंदोलन करणार असल्याचे जाहीर केल्यामुळे सुरक्षेसह अनेक प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मुंबईत मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडीसह कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी उच्च न्यायालयाने जरांगे पाटलांना मुंबईऐवजी खारघर येथील जागेचा पर्याय दिला आहे. उच्च न्यायालयाने आंदोलनाच्या अधिकारावर गदा आणलेली नाही. मनोज जरांगे यांनी आंदोलनासाठी परवानगीच घेतलेली नाही, असे कळल्यानंतर न्यायालयाने जरांगे यांनी आंदोलनासाठी यंत्रणेकडे परवानगी मागावी, ती दिली तर शांततेत मुंबईऐवजी नवी मुंबई, खारघरमध्ये आंदोलन करावे हेही स्पष्ट केले आहे. त्यामुळे न्यायालयाने जरांगेची बाजू मांडण्यासाठी त्यांच्या वतीने न्यायालयात कोणी नसतानाही त्यांच्या आंदोलनाच्या स्वातंत्र्याचे हनन होऊ दिलेले नाही. सरकारी पातळीवरुन जरांगेंना आंदोलन पुढे ढकलण्यासाठी अनेक अर्जवे करण्यात आली. गणपती उत्सव होऊ द्या, त्यानंतर आंदोलन करा, असा मुख्यमंत्र्यांचा निरोप घेऊन गेलेल्या ओएसडींना रिकाम्या हाताने परतावे लागले. गेल्या दोन वर्षांमध्ये अनेकदा उपोषणे झाली. मराठवाड्यातील मराठा समाजाकडे कुणबी दाखले असतील तर त्यांना कुणबी-मराठा जात प्रमाणपत्र देण्यासाठी न्यायमूर्ती संदीप शिंदे समिती काम करत आहे. या समितीला सहा महिने मुदतवाढ देण्यात आली, या मुदतवाढीला मराठा आंदोलकांनीही मान्यता दिलेली आहे. याशिवाय मराठा आरक्षणासाठी मंत्रिमंडळ उपसमिती काम करत आहे. राधाकृष्ण विखे-पाटील समितीचे अध्यक्ष आहेत. या समितीने हैदराबाद गॅझेट आणि इतरही गॅझेटचा आढावा घेण्याचे आदेश दिले आहेत. कायद्याच्या प्रक्रियेत काही बाबी अडकल्या आहेत. त्यावर चचेर्ने तोडगा निघू शकतो मात्र, चचेर्चा आता कंटाळा आला असे म्हणणे लोकशाहीत योग्य होणार नाही. आंदोलनाने शक्तिप्रदर्शन होईल. महामुंबईत महाजनसमुदायावर नियंत्रण ठेवणे एका व्यक्तीला शक्य होईल का, याचाही विचार होण्याची गरज आहे. भलेही जरांगे यांनी चार महिन्यांपूर्वी 29 ऑगस्टपासून मुंबईत आंदोलनाचा इशारा दिला होता, गेल्या चार महिन्यात सरकारने त्या इर्शायाकडे दुर्लक्ष केले. मात्र श्रीगणेशाच्या उत्सवकाळात मुंबईला, मुंबईकरांना आणि सुरक्षा यंत्रणेला वेठीस धरुन मुंबईकरांना अधिक संकटात टाकण्याचे काम होऊ नये, ही अपेक्षा ठेवणे गैर नाही. आंदोलनाचा श्रीगणेशा उत्सवानंतर अधिक जोमानेही होऊ शकतो, त्यासाठी गणरायाचा आशीर्वाद पाठीशी आहेच, याचे भान आणि संयम आंदोलकांनी ठेवला तर उत्सवात मंगलमय वातावरण राहील. गणेशोत्सवकाळात मुंबईला मराठा आंदोलकांच्या अट्टाहासाचे गालबोट लागू नये हीच अपेक्षा.

# ‘ईव्ही’ निर्यातीची नवी पहाट...

अमेरिकेच्या शुल्कधोरणाचे सावट गडद झाले असताना, भारताच्या ईव्ही निर्यातीने नवा टप्पा गाठला आहे. आयातीवरील अवलंबित्व कमी करून स्वदेशी उत्पादनाची ताकद दाखवत भारत आता ग्राहक नव्हे, तर पुरवठादार म्हणून जागतिक स्तरावर आपले धोरणात्मक स्थान मजबूत करत आहे, याचेच हे द्योतक.

भारताच्या वाहन उद्योगासाठी कालचा दिवस ऐतिहासिक ठरला असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते गुजरातमधून ई-व्हिटारा या पहिल्या इलेट्रिक वाहनाच्या निर्यातीला हिरवा कंदील दाखवण्यात आला. यासह भारताने वाहन तंत्रज्ञानाच्या नव्या युगात आत्मविश्वासाने पाऊल टाकले आहे. १००हून अधिक देशांमध्ये ही भारतीय निर्मितीची ईव्ही पोहोचणार असून, हे केवळ एका वाहन कंपनीचे यश नाही, तर मेक इन इंडिया च्या यशाचा खणखणीत पुरावा आहे. काही वर्षांपूर्वीपर्यंत इलेट्रिक वाहनांची निर्मिती ही केवळ प्रयोगशाळा आणि लहान नवोद्योगांपुरती मर्यादित होती. मात्र, आज परिस्थिती पूर्णपणे बदलली असून, २०१४ नंतरच्या दशकात केंद्र सरकारने स्वच्छ ऊर्जा व प्रदूषणमुक्त वाहतूक यासाठी धोरणात्मक उपाययोजना आखण्यास प्रारंभ केला. फेम इंडिया योजना , उत्पादनाशी निगडित प्रोत्साहन (पीएलआय) योजना, बॅटरी मॅन्युफॅक्चरिंगसाठी विशेष पायाभूत सुविधा आणि चार्जिंग स्टेशन नेटवर्क या माध्यमातून भारतातील ईव्ही उत्पादनाने मोठा वेग घेतला.

आज भारतात विकल्या जाणार्या गाड्यांपैकी सुमारे सहा-सात टक्के गाड्या इलेट्रिक आहेत. दुचाकी आणि तीन चाकी विभागात तर हा आकडा १५-२० टक्क्यांपर्यंत पोहोचला आहे. फक्त पाच वर्षांत ईव्ही चे उत्पादन दुपटीहून अधिक झाले असून, दुसरीकडे ईव्ही आयातीवर अवलंबून राहावे लागणारे दिवस आता संपुष्टात आले आहेत. चीन आणि काही प्रमाणात अमेरिका-युरोपकडून येणार्या ईव्हींचे प्रमाण आता नगण्य आहे. ई-




व्हिटाराची होत असलेली निर्यात ही या बदलाचा टप्पा अधोरेखित करणारी ठरली आहे. काही वर्षांपूर्वी आपण अमेरिका व जपानकडून इलेट्रिक वाहन तंत्रज्ञानाची आयात करत होतो. आज मात्र त्याच प्रगत राष्ट्रांना आपण आपली उत्पादने निर्यात करीत आहोत. हा केवळ औद्योगिक आकड्यांमध्ये झालेला बदल नाही, तर आत्मनिर्भरतेच्या आत्मविश्वासाचा जयघोष आहे. या प्रकल्पामुळे भारतीय ईव्ही उत्पादकांना जागतिक बाजारपेठेत स्पर्धात्मक स्थान मिळणार आहे. एकीकडे युरोप आणि अमेरिका हे आजही महागड्या ईव्ही मॉडेल्सच्या निर्मितीत अडकलेले आहेत, तर दुसरीकडे भारत कमी किमतीत, पण गुणवत्तेची हमी देणारी वाहने जगाला देण्यास सज्ज झाला आहे.

या निर्यातीमुळे भारतीय बाजारातील ईव्हींच्या किमतीवरही सकारात्मक परिणाम होण्याची शयता आहे. उत्पादनाचा आलेख वाढल्यामुळे देशांतर्गत ग्राहकांना तुलनेने कमी दरात ईव्ही मिळू शकतात. निर्यातमार्गे मिळणारे विदेशी चलन आणि बाजारपेठेचा होत असलेला विस्तार यांमुळे भारतीय कंपन्यांना संशोधन-विकासासाठी त्यातूनच भांडवल मिळेल. त्यामुळे येणाऱ्या काळात आणखी स्वस्त, अधिक क्षमतेच्या आणि दीर्घकालीन बॅटरी असलेली वाहने देशात रस्त्यांवर धावताना दिसून येतील. भारतीय मध्यमवगार्साठी आजही ईव्हींची किंमत ही मोठी वाटते. मात्र, निर्यातीच्या माध्यमातून उत्पादन खर्चकमी झाला, तर घरगुती बाजारपेठेला यातूनच नवसंजीवनी मिळेल. त्यातूनच ईव्ही क्रांतीला खऱ्या अर्थाने वेग येईल.

अमेरिकेतून भारतात इलेट्रिक वाहनांची आयात अल्प प्रमाणात होत असली, तरी या प्रकल्पामुळे भारताने अमेरिकेला एक थेट संदेश दिला आहे. आता आम्ही आयातदार देश नाही, तर जागतिक निर्यातदार आहोत, असे अमेरिकेला सांगण्यात भारत यशस्वी ठरला आहे. अमेरिकेच्या तुलनेत संरक्षण तसेच तंत्रज्ञान क्षेत्रात मागे असणारा भारत आता नव्या क्षेत्रात याच अमेरिकेशी स्पर्धा करूलागला आहे. चीनच्या दबदब्याला तडा देत, भारताने ईव्ही क्षेत्रातही स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. भारताच्या ईव्ही निर्यातीचा हा नवा टप्पा अमेरिका-भारत संबंधांच्या पार्श्वभूमीवर अधिक महत्त्वाचा ठरतो. आतापर्यंत अमेरिकेतून किंवा इतर पाश्चात्य देशांतून होणार्या ईव्ही आयातीवर आपण अवलंबून होतो, मात्र आता उलट प्रवास सुरू होत आहे. ट्रम्प प्रशासनाने आयातशुल्काच्या धमया दिलेल्या काळात भारताने स्वदेशी उत्पादनावर भर देत जागतिक बाजारपेठेसाठी पयार्यी पुरवठादार म्हणून स्वतःला सिद्ध करणे, हे फार मोठे धोरणात्मक यश आहे. यामुळे अमेरिकेतील वाहन उद्योगावर दबाव येणार असून भारताला फक्त ग्राहक नव्हे, तर नव्या युगाचा पुरवठादार म्हणून जागतिक प्रतिष्ठा मिळणार आहे.

मोदी सरकारने गेल्या दहा वर्षांत वाहन उद्योगातील परिवर्तनासाठी सातत्याने धोरणात्मक निर्णय घेतले. यात फेम इंडिया योजनेचा मुख्यत्वे समावेश करावा लागेल. या योजनेअंतर्गत इलेट्रिक गाड्यांच्या खरेदीवर अनुदान देऊन ग्राहकांचा ओढा वाढवण्यात आला. तसेच, पीएलआय योजनेतून देशांतर्गत उत्पादन वाढवण्यासाठी वाहन कंपन्यांना मोठे प्रोत्साहन दिले गेले. महामार्गांवर तसेच शहरी भागांत हजारो चार्जिंग स्टेशन्स उभारली गेली. लिथियम-आयन बॅटरीच्या स्थानिक उत्पादनाला चालना देण्यात आली. या सगळ्याचा परिपाक म्हणजे आज आपण ईव्ही तंत्रज्ञानात स्वावलंबी झालो आहोत. कधीकाळी आपण इंधनासाठी विदेशावर अवलंबून होतो, पेट्रोल-डिझेलच्या किमतींतील झालेल्या बदलाने देशाच्या अर्थकारणाला मोठा हादरा बसत होता. इलेट्रॉनिस, मोबाईल, तंत्रज्ञानाच्या बाबतीतही आपण आयातदारच होतो. परंतु, गेल्या दशकात भारताने या अवलंबित्वाला धक्का दिला असून, मोबाईल फोन, औषधे, संरक्षणसाहित्य आणि आता इलेट्रिक गाड्या या सगळ्या क्षेत्रांत आपण जगाचे पुरवठादार बनलो आहोत.

ईव्ही निर्यातीची सुरुवात ही त्या व्यापक परिवर्तनाची खूण आहे. जगाचे वर्कशॉप बनण्याचे स्वप्न भारताने आज प्रत्यक्षात आणले आहे. भारताची ईव्ही निर्यात ही केवळ एका उद्योगाची उपलब्धी नाही, तर राष्ट्रीय आत्मनिर्भरतेचा नवा टप्पा आहे. मोदी सरकारच्या धोरणांना, उद्योगविश्वाच्या सामर्थ्यार्ला आणि भारतीय अभियंत्यांच्या कौशल्याला मिळालेला हा यशाचा मुकूट आहे. १०० देशांमध्ये भारतीय ईव्ही पोहोचणार, म्हणजे मेड इन इंडिया या शिक्क्याला जागतिक सन्मान मिळणार आहे. प्रदूषणमुक्त भविष्यासाठी जग प्रयत्नशील आहे. अशा वेळी भारताची गाडी आता पहिल्या रांगेत आत्मविश्वासाने धावत आहे. भारतासाठी ही नक्कीच अभिमानाची बाब!

# मग भारतीयांच्या मानवाधिकारांचे काय?

बांगलादेशी घुसखोरही शेवटी माणसंच आहेत. त्यांनाही भारतात राहण्याचा तितकाच हक्क आहे, अशी मुक्ताफळे गांधी घराण्याच्या निष्ठावंत आणि नियोजन आयोगाच्या माजी सदस्या सैयदा हमीद यांनी आसामच्या भूमीवरून उधळली. यावरून घुसखोरांच्या गंभीर समस्येकडे बघण्याचा काँग्रेस आणि डाव्यांचा मुस्लीमधार्जिणा आणि देशविरोधी दृष्टिकोन स्पष्ट होतोच. पण, मग घुसखोरांमुळे धोक्यात येणाऱ्या भारतीयांच्या मानवाधिकारांचे काय, याचे उत्तरही सैयदा यांनी द्यावे.

धीच आपला देश १४० कोटी लोकसंख्येचा सामना करीत आहे. त्यामुळे आम्ही सर्व देशांतील लोकांना पोटात घेऊ शकत नाही. भारत धर्मशाळा नाही की कुणीही यावे आणि इथे स्थायिक व्हावे, असे निरीक्षण एका श्रीलंकन तामिळ व्यक्तीच्या खटल्यावरील सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने मे महिन्यात नोंदवले होते. याचाच अर्थ, घुसखोरांना भारतात थारा नाही, हा स्पष्ट संदेशच सर्वोच्च न्यायालयाने दिला होता. असे असतानाही, काही काँग्रेसी आणि डाव्या पुरोगाम्यांना आसाममधील बांगलादेशी घुसखोरांच्या मानवाधिकारांचा एकाएकी प्रचंड उमाळा आला. तोही इतका की, बांगलादेशी ही माणसेच आहेत. ते हैवान नाहीत. हे जग इतके मोठे आहे. मग इथेही बांगलादेशी राहूच शकतात, असे म्हणण्यापर्यंत या कंपूतील सामाजिक कार्यकर्त्या सैयदा हमीद यांची मजल गेली. याचाच अर्थ, सरकारची बेकायदेशीर बांगलादेशी घुसखोरांविरुद्धची कारवाई या तथाकथित मानवाधिकार कार्यकर्त्यांना मान्य नाही आणि सर्वोच्च न्यायालयाने नोंदवलेले निरीक्षणही त्यांना अमान्य! असा हा सगळा प्रकार म्हणजे, खाल्ल्या मिठाला न जागण्याचा पराकोटीचा कृतघ्नपणाच!

पण, हा कृतघ्नपणा करणाऱ्या सैयदा बेगम एकट्या नाहीत. आसाम नागरिक संमेलन नावाच्या अशाच मानवाधिकाराचा बुरखा पांघरलेल्या संस्थेने सैयदा हमीद, प्रशांत भूषण, हर्ष मंदर, जवाहर सरकार अशा डाव्या-पुरोगामी तथाकथित बुद्धिजीवींच्या टोळक्यालाच आसाममध्ये आमंत्रित केले होते. आंचलिक गण मोर्चाचे अध्यक्ष, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते आणि राज्यसभा खासदार असलेल्या अजित कुमार भुयान यांची ही संस्था. या मंडळींना आसाममध्ये बोलवण्याचा उद्देशच मुळी हा की, येथील बांगलादेशी घुसखोरांविरोधातील हिमंता सरमा सरकारची कारवाई कशी अमानवीय आणि अत्याचारी आहे, याचे जगाला दर्शन घडावे. हेच काम या कंपूने माध्यमांसमोर अगदी



इमानेइतबारे केले. सयैदासारख्यांना तर बांगलादेशींमुळे भारतीयांचे हक्क हिरावले जातात, हीच बाब मुळी न पटणारी! त्यांना हा सगळा मुद्दाम मुसलमानांना दिला जाणारा त्रास आणि त्यांच्यावरील कयामत वाटते. म्हणूनच गंगा-जमुना तहजीब चा दाखल देत, त्यांनी घुसखोर असले तरी तीसुद्धा शेवटी माणसंच आहेत, अशी मानवतावादी बांग ठोकली. पाकिस्तानचे माजी राष्ट्रपती झुल्फिकार अली भुट्टोंच्या पुस्तकाचे चरित्रलेखन करणाऱ्या, हिजाबला विरोध ही उजव्या विचारांची सत्तेत राहण्यासाठी केली गेलेली आणखी एक खेळी आहे, असे मानणार्या सैयदा यांच्याकडून दुसरी अपेक्षा ती काय म्हणा! दुसरीकडे ज्येष्ठ वकील प्रशांत भूषण यांनीही सयैदा यांच्या तकार्ला लाजवेल असा जावईशोध लावला. त्यांच्या दाव्यानुसार, आसामचे हिमंता बिस्व सरमा यांचे सरकार हे भारतीय मुस्लिमांनाच बांगलादेशी घुसखोर ठरवून बांगलादेशात पाठवित आहे. त्यामुळे आसाम सरकारच्या बांगलादेशी घुसखोरांविरोधातील कारवाईला मानवाधिकारांच्या कचाट्यात अडकवण्याचा, तसेच यावरून आंतरराष्ट्रीय माध्यमांचे मुद्दाम लक्ष आकर्षित करण्याचा हा सगळा अट्टाहास. पण, सत्य हेच की, आसाममधील घुसखोरांविरोधातील कारवाई ही आसामी मुस्लीम, भारतातील अन्य राज्यांतून आसाममधून स्थलांतरित आलेले मुस्लीम यांच्याविरोधात नाही, तर १९७१ नंतर बेकायदेशीररित्या आसाममध्ये दाखल झालेल्या मुस्लिमांविरोधात आहे. ही बाब मुख्यमंत्री सरमा यांनी वेळोवेळी स्पष्टदेखील केली.

शिवाय एनआरसीच्या माध्यमातूनही हीच प्रक्रिया राबविली जात आहे. जून २०२५ पर्यंत आसाममधून ३३० घुसखोरांना पुन्हा बांगलादेशात पाठविण्यात आले, तर दि. ३ ऑगस्ट रोजी, सलग पाच दिवसांच्या कारवाईत आसाम सरकारने २५० घरे आणि ८ हजार, ९०० बिघा जमीन घुसखोरीतून मुक्त केली. पण, घुसखोरमुक्त आसाम च्या दिशेने चाललेल्या सरकारच्या वाटेत मुद्दाम खोडा टाकण्याचाच हा काँग्रेस आणि डाव्या बुद्धिजीवींचा प्रयत्न.

मुळात, घुसखोरांकडे मानवतावादी नजरेतून बघणे म्हणजे आपल्या देशातील नागरिकांच्या मानवाधिकारांवर गदा आणण्यासारखेच. कारण, या घुसखोरांकडून स्थानिक नागरिकांचे रोजगारही हिरावले जातात. बांगलादेशी घुसखोर हे स्वस्तात उपलब्ध होणारे मजूर. त्यामुळे तुटपुंज्या मजुरीवरही ते बांधकामासारख्या ठिकाणी कामाला सहज उपलब्ध होतात. अशीच छोटी-मोठी रोजंदारीची कामे हे बांगलादेशी घुसखोर सहजगत्या बळकावतात आणि परिणामी स्थानिक भारतीय रोजगारापासून वंचित राहतात. एवढेच नाही, तर घुसखोरीमुळे शहरे बकाल होतात, वस्त्या महिलांसाठी असुरक्षित होतात आणि सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेवरील, अन्य संसाधनांवरील ताणही वाढतो. त्यामुळे बांगलादेशी घुसखोरांची समस्या ही एकप्रकारे भारताला अंतर्गत पोखरणारी वाळवीच!

२०१६ साली सरकारने राज्यसभेत दिलेल्या अधिकृत आकडेवारीनुसार, देशभरातील बेकायदेशीर बांगलादेशी घुसखोरांची संख्या ही जवळपास दोन कोटींच्या घरात होती. ही आकडेवारी २०१६ची, तर आज २०२५ मध्ये त्यात किती संख्येने भर पडली असेल, याची कल्पना केली तरी या घुसखोरीच्या समस्येची भीषणता लक्षात यावी. पण, संपुआचे सरकार असताना २००४ साली बांगलादेशी घुसखोरांची भारतातील संख्या ही १.२ कोटी इतकी असल्याची आकडेवारी आधी देऊन, नंतर ती सरकारने मागे घेतली होती. याचाच अर्थ, घुसखोरांची खरी आकडेवारी समोर न आणण्यापासून, ते त्यांना वेळोवेळी संरक्षित करण्याचे पद्धतशीर धोरणच संपुआच्या काळात राबविले गेले. म्हणूनच घुसखोरांची संख्या दशकभरात एक कोटींवरून दोन कोटींपार पोहोचली.

पण, याउलट ऑपरेशन पूशबॅक अंतर्गत केवळ आसामच नाही, तर गुजरात, महाराष्ट्रासह अन्य राज्यांतूनही मोठ्या संख्येने बेकायदेशीर बांगलादेशी घुसखोरांची धरपकड सुरू असून, त्यांना मायदेशी पाठविले जात आहे.

पण, काँग्रेसी आणि डाव्यांच्या दृष्टीने ते घुसखोर नसून त्यांचे हक्काचे मतदार आहेत. म्हणूनच या घुसखोरांच्या घटीमुळे वषार्नुवर्षे बांधलेल्या मुस्लीम मतपेढ्या कोसळतील, हीच या मंडळींना सतावणारी भीती. बांगलादेशी घुसखोरीची कीड देशभर पसरलेली असली, तरी बांगलादेशशी लागून असलेल्या सीमावर्ती राज्यांतील जिल्ह्यांत यांची भीषणता प्रकषार्ने जाणवते. बिहार आणि ईशान्य भारत यांना जोडणार्या सिलीगुडी कॉरिडोरच्या भागातही लोकसंख्या बदलामुळे मुस्लीम धर्मीय आता बहुसंख्य झाले आहेत. झारखंडच्या संथाळ परगणा जिल्ह्यात १९७० साली मुस्लिमांची संख्या केवळ सात टक्के होती, आता हीच संख्या २७ टक्क्यांवर आली आहे. हाच लोकसंख्याबदलाचा धोका पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही त्यांच्या स्वातंत्र्य दिनाच्या भाषणात प्रकषार्ने अधोरेखित केला. नियोजनबद्ध षड्यंत्राखाली भारताची लोकसंख्येची रचना बदलण्याचा प्रयत्न असल्याचे सांगत, घुसखोरांना वसवून देशातील वनवासी, माता आणि भगिनींनी लक्ष्य करण्यात येत आहे. मात्र, यापुढे हा प्रकार खपवून घेतला जाणार नसून घुसखोरांविरोधात हाय पॉवर डेमोग्राफी मिशन सुरू करून घुसखोरांना देशाबाहेर काढले जाईल, अशी घोषणा पंतप्रधानांनी केली. पंतप्रधानांनी यंदाच्या स्वातंत्र्य दिनी लोकसंख्याबदलाच्या मुद्द्याला केंद्रस्थानी आणले असले, तरी गेल्या कित्येक वर्षांपासून घुसखोरीविरोधात सरकारचा लढा सुरूच आहे. आसामचा मुख्यमंत्री एक दिवस बांगलादेशी मुस्लीम असेल, अशी जी भीती व्यक्त केली जातेय, त्यामागे हेच पद्धतशीर षड्यंत्र आहे. पण, भारतातील काँग्रेसी आणि डाव्या कंपूने मानवाधिकाराच्या नावाखाली घुसखोरांचा बचाव करुन आपलाच कपाळमोक्ष करून घेतला आहे. अशाप्रकारे आज बेकायदेशीर घुसखोरांना अमेरिकेपासून ते पाकिस्तानपर्यंत अनेक देश बाहेरचा रस्ता दाखवित आहेत. पाकिस्तानने तर मुसलमान असलेल्या अफगाणींनाही हाकलवून लावले. बांगलादेश खुद्द म्यानमारच्या रोहिंग्या मुसलमानांना स्वीकारायला अद्याप तयार नाहीच. मग अशा जागतिक परिस्थितीत भारतातील बांगलादेशी घुसखोरांची तळी उचलणार्या सैयदा आणि डाव्या कंपूचा उद्देश हा मानवाधिकारांचा नक्कीच नाही, तर तो मानवाधिकारांआडून मतपेढीच्या रक्षणाचाच आहे!


# गिरण्यांच्या जमिनींना ग्रहण

मुंबईतील कमला सह सहा गिरण्यांच्या जमिनीवरील पुनर्विकासाच्या कामात नियमांचे मोठ्या प्रमाणावर उल्लंघन झाले असल्याचा ठपका विधिमंडळाच्या आश्वासन समितीने ठेवला आहे. विधिमंडळाच्या अधिवेशनात एखाद्या प्रश्नाच्या उत्तरात सरकारकडून जी आश्वासने दिली जातात, त्यांची पूर्तता योग्य रीतीने होते किंवा कसे हे पाहण्यासाठी विधिमंडळाच्या सदस्यांची ही समिती आहे. या समितीने ३० व ३१ जुलै रोजी मिठी नदी व मुंबईतील १२ गिरण्यांना विधिमंडळातील सरकारने दिलेल्या आश्वासनाबाबत भेटी दिल्या व त्यातून वरील बाबी समोर आल्या. मुळात बंद पडलेल्या गिरण्या पुन्हा सुरू करण्यासाठी भांडवलाची उभारणी करणे गिरणी मालकांना शक्य व्हावे म्हणून गिरण्यांच्या अतिरिक्त जमिनी विकण्याची उपाययोजना सुरू केली गेली होती. खरं सांगायचे तर संपामुळे गिरण्या बंद पडल्या, असा गैरसमज राज्यातील सामान्य जनतेच्या मनात सरकार व मालकधार्जिण्या विचारवंतांनी इतका रुजवला की आज तेच सत्य असल्याचे असंख्यांना वाटते. मात्र, डॉ. दत्ता सामंत यांनी पुकारलेला संप तांत्रिकदृष्ट्या कधीच मागे घेतला नाही. दीड वर्षं मुंबईतील जवळपास दीड ते दोन लाख कामगारांनी अत्यंत नेटाने हा संप चालवला होता. पुढे मात्र कामगारांचा धीर सुटत चालला व त्यांनी माना खाली घालून हरलेल्या सैन्याप्रमाणे पुन्हा कामावर जायला सुरुवात केली होती. त्यामुळे मुंबईतील सगळ्या गिरण्या व्यवस्थित सुरू झाल्या होत्या.

इतकेच नव्हे तर ऐंशीच्या दशकाच्या मध्यावर मुंबईतील एका गिरणीने १०० कोटींचा नफा कमावल्याची बातमी अर्थ वृत्तांकन करणाऱ्या एका अग्रणी दैनिकाने पहिल्या पानावर मुख्य बातमी म्हणून प्रसिद्ध केली होती. १९९१ साली शरद पवार यांनी मुंबईतील विकास नियमावलीत बदल केला व गिरण्यांच्या आधुनिकीकरणासाठी भांडवलाची गरज असून, गिरण्यांच्या जमिनीच्या विक्रीस परवानगी दिली. त्यात ही विक्री करताना जमिनीचे तीन समान हिस्से करून त्यातील एक मालकास, दुसरा मुंबई महानगरपालिकेस व तिसरा सर्वसामान्यांसाठी घरे व्हावीत म्हणून म्हाडाला देण्याचे ठरले होते. गिरण्या बंद होण्याची सुरुवात ही विकास नियमावलीतील या बदलानंतर झाली. गिरणी मालकांची दोन तृतियांश जमीन यात जाणार असल्यामुळे चारचा एफएसआय देऊन त्यांचा तोटा भरून काढण्याची सूटही सरकारने दिली होती. तरीही मालकांचे रडगाणे सुरू झाल्याने पुढे दहा वर्षांनी विलासराव देशमुख व त्यानंतर सुशीलकुमार शिंदे या दोघांच्याही मुख्यमंत्री कालावधीत वरील नियमावलीत आणखी बदल झाले. जमिनीच्या वाटपात गिरणीचे बांधकाम असलेली जागा वगळून केवळ मोकळ्या जागेचेच वाटप करण्याचा निर्णय झाला व गिरणी मालकांच्या वाट्याला गिरण्यांची ८० टक्के जमीन आली. इतके असूनही ज्या जमिनी कोणे एके काळी सरकारने अत्यंत फुटकळ किमतीत उद्योग उभा राहावा म्हणून मालकांना दिल्या होत्या, त्यावर नियमानुसार काम करावे तर तेही झालेले दिसत नाही. मुंबईसारख्या शहरात आयटीसारखा उद्योग उभा राहावा म्हणून संबंधित जमिनीवर ८० टक्के आयटी पार्क व्हावे व उर्वरित जमिनीवर इतर व्यावसायिक कामे करावीत, या नियमाला धाब्यावर बसवून बाकी सगळे धंदे राजरोसपणे गेले तीन दशके अव्याहत सुरू आहेत. हे सर्वसामान्यांच्या नजरेत दररोज येतच होते, मात्र चार वर्षांपूर्वी कुठल्या चर्चेत सरकारने दिलेल्या आश्वासनाची पूर्तता झाली किंवा कसे, हे शोधण्यासाठी समिती गेल्यावर आता पुन्हा जुने सत्य नव्याने समोर आले आहे. मुंबईत गाड्या उभ्या करणे ही मोठी समस्या असताना या गिरण्यांमधील पार्किंगसाठी महापालिकेच्या पार्किंगच्या दुप्पट तिप्पट भाडे आकारले जात असल्याचेही समोर आले आहे. इतकी मोठी जागा व इतका मोठा एफएसआय मिळूनही नियमांना पायदळी तुडवण्यामागील ही मानसिकता समोर दिसेल ते नियम धाब्यावर बसवून ओरबाडून खाण्याच्याच प्रवृत्तीचे निदर्शक आहे. अनेक ठिकाणी इमारतींच्या गच्चीत पावसाळ्याकरिता टाकलेले तात्पुरते छप्पर कायमस्वरूपी करून त्याचा व्यावसायिक वापर सुरू आहे. त्यामुळेच या गिरण्यांमधील इमारतींना अनेकदा आगी लागून त्यात मोठ्या प्रमाणावर जीवितहानी घडल्याचा इतिहास ताजा आहे.

आता विधिमंडळाच्या आश्वासन समितीला जे वास्तव दिसले त्याचा अहवाल ही समिती विधिमंडळात ठेवेलच. मात्र या अहवालावर राणा भीमदेवी थाटात अनेक जण केवळ साधक बाधक चर्चा करतील व पुढे सगळे थंड बस्त्यात बांधून आपल्या देशातील राजकीय उच्च परंपरांचे पालन करतील की सर्वसामान्यांच्या घामातून उभ्या राहिलेल्या या शहराचा कारभार कायदे व नियमांनुसारच चालणार हे कठोरपणे दाखवून देतील, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

# उजव्या सोंडेचा गणपती खरंच कडक असतो का?



उजव्या सोंडेचा गणपती असे फक्त म्हटले तरी त्यांची उपासना कडक असते. त्यांचे सोवळे ओवळे फार असते, थोडी चूक म्हणजे आपल्याला मोठा फटका बसू शकतो अशाप्रकारे लोक बोलतात. खरंतर उजव्या सोंडेच्या गणपती संदर्भात धार्मिक ग्रंथात फारसा ऊहापोह केलेला आढळत नाही. गणेशाच्या वेगवेगळ्या ध्यानांमध्येही विशेष उल्लेख आढळत नाही. त्यामुळे आपसुक लोकांकडून काही समजूती आणि मान्यता प्रचलीत झालेल्या आहेत. एकूण उजव्या सोंडेचा गणपती याबद्दल शास्त्र काय सांगते ते बघूया.

गणपती- महागणपती दोन भिन्न संकल्पना

शास्त्रात असं सांगितलं आहे गणपतीच्या सोंडेचा अग्र उजव्या हाताकडील वरील बाजूस वळला तर तो सिद्धिविनायक, डाव्या हाताकडे वरच्या बाजूला वळला तर ऋद्धिविनायक समजला जातो. जर सोंडेचे टोक त्याच्या उजव्या हाताकडे खाली वळले असेल तर तो बुद्धिविनायक आणि डाव्या हाताकडे खाली वळले तर तो शक्तीविनायक आहे.

गणेश उपासकांनी गणपती आणि महागणपती या दोन भिन्न संकल्पना आहेत असे सांगितले असून माता पार्वतीने तयार केलेला गणपती हा महागणपतीचा अवतार आहे. मूतीर्ला आकार देवून त्यात महागणपतीचे आवाहन केले आणि त्याने विविध प्रसंगी विविध प्रकारचे अवतार घेऊन दुष्टांचा नायनाट केला.

उजव्या सोंडेच्या गणपतीचा पूजा विधी

गणपती सगळ्या भक्तांच्या इच्छा पूर्ण करतो त्यामुळे एखादी विशिष्ट सिद्धी किंवा मोक्षसिद्धिच्या प्राप्तीसाठी गणपतीची आराधना केली जाते, तेव्हा उजवीकडे सोंड असलेल्या गणपतीचे पूजन करण्याची प्रथा प्रचलित आहे. अशावेळी पार्थिव गणपतीची आराधना केली जाते. या पार्थिव गणेशाच्या आराधनेमध्ये स्वतःच्या हाताने गणपतीची मूर्ती तयार केली जाते ती मूर्ती म्हणजे सिद्धिविनायक आणि त्याची अत्यंत भक्तीभावाने, ध्यानपूर्वक षोडशोपचार पूजन केले जाते आणि लगेचच विसर्जन ही करावे लागते. ही पूजा अत्यंत शुचिर्भुतपणे आणि तंतोतंत विधिविधानपूर्वक करणे अत्यंत आवश्यक असते. तुम्ही अष्टविनायक गणपती पाहिले असतील तिथे सिद्धटेकचा सिद्धिविनायक हा एकमेव उजव्या सोंडेचा गणपती आहे. तर अष्टविनायकांपैकी लेण्याद्रीचा गिरिजात्मक हा गणेशावतार आणि अन्य सात महागणपती आहेत, असे म्हटले जाते.

डोळसपणे भक्ती करा

गणपती भक्तांच्या इच्छा पूर्ण करतो, तो कोणाचेही अमंगल करत नाही. त्यामुळे गणपती उजव्या सोंडेचा आहे की डाव्या सोंडेचा यापेक्षा मनापासून भक्तीभावाने केलेली पूजा, उपासना महत्त्वाची आहे. काही मान्यता आपल्याकडे तयार होतात त्यामुळे लोकं नियमाने पूजा करता असं म्हटलं जातं पण भगवंत भक्ताचं कधीही वाईट करत नाही. त्यामुळे डोळसपणे भक्ती करा तुमच्या मनोकामना पूर्ण होतील आणि तुम्हाला मानसिक समाधान देखील मिळेल.

# सोंड नसलेल्या गणपतीचे एकमेव मंदिर



घराघरात बाप्पा विराजमान झालेले आहेत. सर्वत्र बाप्पाच्या आगमनाने चैतन्यमय वातावरण आहे. आरत्या, भजनं गायली जात आहे. अशा या लाडक्या बाप्पाचे जगभरात अनेक मंदिरे आहेत. पण, काही मंदिरे ही विशेष परंपरेसाठी आणि वैशिष्ट्यांमुळे प्रसिद्ध आहेत, त्यापैंकी एक आहे राजस्थानमधील गढ गणेश मंदिर. कारण येथील गणेशाची मूर्ती ही विना सोंडेची आहे. जाणून घेऊयात, या मंदिराविषयी विशेष गोष्टी,

300 वर्षे इतिहास

गढ मंदिराचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे येथे गणपतीची बालरुपातील मूर्ती सोंड नसलेली आहे. या मूतीर्ला पुरुषकृति स्वरूप असे म्हटले जाते. हे मंदिर 18 व्या शतकात महाराजा सवाई जयसिंह दुसरे यांनी बांधले आहे, असे सांगितले जाते. या मंदिराविषयी आणखी विशेष गोष्ट सांगायची झाल्यास, या मंदिरात ठेवलेले दोन विशाल मूषक. भक्तमंडळी आपल्या समस्या किंवा इच्छा या मूषकांच्या कानात सांगतात आणि हे मूषक ही गोष्ट बाप्पापर्यंत पोहोचवतात अशी श्रद्धा आहे.

सिटी पॅलेसच्या गच्चीवरून करायची आरती

मंदिराची खास गोष्ट म्हणजे सवाई जयसिंगच्या वास्तुविशारदांनी हे मंदिर अशा ठिकाणी बांधले की, राजा सिटी पॅलेसमधून उभा राहून दररोज सकाळ संध्याकाळ मंदिरात होणाऱ्या आरतीच्या वेळी मंदिर पाहू शकत होते.

अशी आहे मान्यता -

हे मंदिर सुमारे 300 वर्षे जुने मानले जाते आणि अशी मान्यता आहे की इथे गणपतीचे स्वरूप तसेच आहे जसे पार्वतीने त्यांना जन्म दिला होता, म्हणजेच सोंडेशिवाय.

365 पायऱ्या चढल्यानंतर बाप्पाचे दर्शन -

या मंदिरात पोहोचण्यासाठी 365 पायऱ्या चढाव्या लागतात. मंदिराच्या पायऱ्या चढणं घाम गाळणारे असले तरी मंदिरातील बाप्पाचे दर्शन घेतल्यावर मिळणारी शांतता आणि समाधान सगळा थकवा दूर करणारे आहे.

मंदिर कुठे आहे?

गढ गणेश मंदिर राजस्थानची राजधानी जयपूरमध्ये नाहरगढ किल्ल्याजवळ, अरवलीच्या पहाडांवर वसलेले आहे.

# दीड, पाच, सात आणि दहा दिवसांच्या गणपती विसर्जनाची परंपरा!

गजानना श्री गणराया आधी वंदु तूज मोरया...गणराज रंगी नाचतो अशी भक्तीगीतांनी आज सगळं वातावरण आनंदी, उत्साही झालेलं असेल. आपले लाडके बाप्पा घराघरात, मंडपात तसेच कार्यालयात विराजमान झाले आहेत. त्यांची पूजा उपासना करण्यासाठी आपण जय्यत तयारी केली असेल. पंचांगानुसार भाद्रपद शुक्ल पक्षातील चतुर्थी सर्वात खास असून दहा दिवस बाप्पाची सेवा करून अकराव्या अर्थात अनंत चतुर्दशीला बाप्पाला निरोप दिला जातो. आपल्याकडे दीड, पाच, सात दिवसांनी घरगुती गणपतींचे विसर्जन केले जाते. ही प्रथा का पडली किंवा यासंदभार्ता शास्त्रात काय म्हटले आहे चला तर सविस्तर पाहूया.

दीड दिवसाचे विसर्जन आणि शेतीचा संबंध

सध्याच्या काळात दिवस धावपळीचे आहेत. नोकरी-व्यवसायानिमित्त लोकांना वेळ कमीच मिळतो पण गणपतीची आराधना उपासना करायची असते मग अशावेळी दीड दिवसाचे गणपती बसवून त्यांची सेवा केली जाते. बाप्पा जरी दीड दिवस आपल्या घरी असला तरी तो वातावरणात एक वेगळीच ऊर्जा आणि उत्साह भरतो. शास्त्रानुसार दीड दिवसात गणपतीचे विसर्जन करतात ही परंपरा आधीपासून चालत आली आहे. असे सांगतात की दीड दिवासांच्या गणपती विसर्जन आणि शेती यांचा संबंध आहे. गणेश चतुर्थीपर्यंत धान्याची पाती शेतात दिसतात, तेव्हा धरणी मातेचे आभार मानण्यासाठी तिथे गणपती तयार करून त्याची पूजा केली जाते. प्राणप्रतिष्ठा केलेला हा बाप्पा दीड दिवसानंतर आपल्या घरी जातो म्हणजे त्याचे नदीत विसर्जन केले जाते.

गणेश पूजन व्रत दीड दिवसाचे

काहीजण असेही सांगतात की गणपतीची प्राणप्रतिष्ठा केल्यानंतर जे व्रत केले जाते ते एक ते दीड दिवसांचे असते त्यामुळे दीड दिवसांनी विसर्जन केले जाते. दीड दिवसांच्या गणपती विसर्जनाबद्दल अशी ही माहिती सापडते की भाद्रपद महिन्यातील गणेश चतुर्थी म्हणजे पार्थीव गणेश पूजनाचे व्रत आहे. या व्रताचा कालावधी दिवासाचे ४ आणि रात्रीचा १ असे ५ प्रहर धरले जातात. तसेच अशी ही एक मान्यता आहे की जेव्हा तुम्ही गणपतीची प्राणप्रतिष्ठा करता तेव्हा त्यात एक प्रकारचे जीवत्व प्राप्त होते, ते एक दिवस राहते त्यामुळे एक दिवस ते व्रत करून बाप्पाचे विसर्जन दुसऱ्या दिवशी अर्थात दीड दिवसांनी केले जात असे. आता एक काळ असा होता जेव्हा घड्याळ, दिनदर्शिका तयार झाल्या नव्हत्या, लोक विशिष्ट पद्धतीने प्रहराची गणना करायचे दीड दिवस संपल्यानंतर चतुर्थी संपते असं गणितच लोकांच्या मनात बसलं होतं. तेव्हा बाप्पाची विधीवत पूजा करून शास्त्रानुसार विसर्जनही होत असे. यासंदर्भात अधिक माहिती घेत असताना असे ही समजले की कर्नाटकातील बनवासी येथे १५०० वर्षे जुनी अर्धी गणेश मूर्ती पूजली जाते जी दीड दिवसांच्या संकल्पनेसोबत जोडलेली आहे.

गौरींसह गणपतीचे विसर्जन

आपल्याकडे गणपती सोबत गौरी पूजनही होते. गौरी गणपतीचे विसर्जन सातव्या दिवशी केले जाते. आता काहीजण पाचव्या दिवशी गौरीचे विसर्जन झाल्यानंतर सातव्या दिवशी गणपतीचे विसर्जन करतात. यासंदर्भात असे सांगतात की गौरी आणि गणपती या दोन वेगळ्या देवता असून गौरीचे आगमन आणि विसर्जन नक्षत्रानुसार होते. ज्या नक्षत्रात गौरी येते त्याच्या पुढच्या नक्षत्रात तिचे विसर्जन केले जाते. आता कधी कधी नक्षत्र पुढे मागे होतात त्यानुसार विसर्जन पाचव्या किंवा सातव्या दिवशी केले जाते.

विसर्जनासंदर्भात एक पौराणिक कथा

गणपतीचे विसर्जन पाचव्या दिवशी का केले जाते यासंदर्भात एक पौराणिक कथा सांगतात की, महर्षी व्यास महाभारत लिहित असताना गणेश लेखनिक होते. लिहिताना गणेशाच्या अंगातील पाणी कमी होऊन त्वचा कोरडी पडली आणि अंगाला जळजळ होऊ लागली. व्यास गुरूंनी गणपतीच्या अंगाला ओल्या मातीचा लेप लावला. चतुर्थीर्ला हा लेप लावला आणि पंचमीला ताप उतरल्यावर पाण्यात विसर्जित केला. याचा अर्थ चतुर्थीर्ला पूजन आणि पंचमीला विसर्जन अशी प्रथा सुरू झाली.

गणपती उपासना, मान्यता अन् श्रद्धा

आता कालांतराने यात बदल होत गेले, लोकांचे विचार, राहणीमान बदलले तसेच उत्सवाची रंगत अधिक वाढावी यासाठी पाच, सात दिवसांनी गणपतीचे विसर्जन केले जावू लागले. काही वेळेला हा नवसाचा भाग ही मानला जातो. म्हणजे भक्तगण नवस करतात आणि नवस पूर्ण झाला की पाच किंवा सात दिवस बाप्पाची पूजा करून त्याचे विसर्जन करतात. सार्वजनिक गणपतीचे विसर्जन तर अकराव्या दिवशी अर्थात अनंत चतुर्दशीला केले जाते. काही भक्तगण असे ही आहेत जे नवस बोलतात तब्बल एकवीस दिवस गणपतीची उपासना करतात. आता या सगळ्या गोष्टी आपली मान्यता आणि श्रद्धा यावर अवलंबून आहेत.

हा बाप्पा अगदी थोड्या काळासाठी आपल्या सोबत असतो पण वर्षभराचा उत्साह, ऊर्जा देवून जातो. तेव्हा बोला गणपती बाप्पा मोरया....मंगलमूर्ती मोरया....



# भक्ती आणि परंपरेचा संगम; दगडूशेठसमोर 35 हजार महिलांचे अथर्वशीर्ष पठण




दरवर्षीच्या प्रथेप्रमाणे ऋषिपंचमीनिमित्त पुण्यातील दगडूशेठ हलवाई गणपतीच्या मंदिरासमोर तब्बल 35 हजार महिलांनी अथर्वशीर्ष पठण केले आहे. भक्तिमय वातावरणात हजारो महिला एकत्र आल्याने गदीर्चा उच्चांक पाहायला मिळाला. यावेळी राज्यसभा खासदार सुनेत्रा पवार, पुणे विभागाच्या धमार्दाय सहआयुक्त रजनी क्षीरसागर, न्यायाधीश किरण क्षीरसागर, प्रसेनजीत फडणवीस, ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, राजाभाऊ चव्हाण, शुभांगी भालेराव, अर्चना भालेराव, सुवर्णयुग तरुण मंडळाचे अध्यक्ष प्रकाश चव्हाण, यतीश रासने, सौरभ रायकर, मंगेश सूर्यवंशी, तुषार रायकर, अंकुश रासने यांसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. अथर्वशीर्ष पठणानंतर महाआरती करण्यात आली. श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळच्या वतीने ट्रस्टच्या 133 व्या वर्षीच्या गणेशोत्सवात उत्सव मंडपासमोर हा सोहळा आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्यात स्त्री शक्तीचा जागर अनुभवायला मिळाला. विशेष म्हणजे पावसाच्या सरी कोसळत असतानाही पारंपरिक वेशात मध्यरात्री 2 वाजल्यापासून महिलांनी या सोहळ्याला हजेरी लावली होती.

शंखनाद करून या कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर ओंकार जप, गजानना गजानना मंगलमूर्ती गजानना या गणेशगीताच्या सादरीकरणाने वातावरण मंत्रमुग्ध झाले. महिलांनी मुख्य अथर्वशीर्ष पठण करीत गणरायाला नमन केले. यानिमित्त मंदिरापासून ते नाना वाडयापर्यंतच्या परिसरात महिलांची गर्दी झाली होती. यावेळी सुनेत्रा पवार यांनी भावना व्यक्त केल्या आहेत. केवळ महाराष्ट्रातूनच नव्हे भारतासह विविध ठिकाणांहून महिला मोठ्या संख्येने या उपक्रमासाठी आल्या आहेत. गणेशाचरणी लीन होत असताना बाप्पाच्या आशीवादाने सगळ्यांना आरोग्य, प्रगती आणि भरभराटीचे हे वर्ष जावो, अशी प्रार्थना त्यांनी केली.

# तुळस पवित्र असूनही गणेशपूजेत वर्ज्य का?

लाडका बाप्पा घरोघरी विराजमान झाले आहेत. आज सुरू झालेला हा गणेशोत्सव अनंत चतुर्दशीपर्यंत सुरू असणार आहे. घराघरात, मोठ-मोठ्या मंडळात श्री गणेशाची प्रतिष्ठापना करण्यात आली आहे. सर्वत्र भक्तीमय वातावरण निर्माण झाले असून पूजा, आरत्या, भजन अशा वेगवेगळ्या माध्यमांतून गणरायाची सेवा सुरू आहे. लाडू, मोदकांचा नैवेद्य गणेशाला अर्पण केला जात आहे. पूजेत वेगवेगळी फुलं, दूर्वा, शमीपत्रंही गणपतीला वाहिली जातात. मात्र, गणपतीला तुळस कधीही वाहिलं जात नाही. असे का? चला तर मग जाणून घेऊयात तुळस पवित्र असूनही गणेशपूजेत वर्ज्य का,



यासाठी तुळस वाहिली जात नाही झ

पुराणकथेनुसार, एकदा गणपती ध्यान करत होते. तपश्चर्येमध्ये गढून गेले होते. गणपतीने सुंदर वस्त्र आणि कंठी परिधान केली होती. तेव्हाच तिथून तुळशीदेवी जात होती. जाता जाता तिचं लक्ष गणपती बाप्पाकडे गेलं आणि ती त्याचं रुप पाहून मोहित झाली. यानंतर तिने गणपती बाप्पाच्या ध्यानधारणेचा भंग केला. बाप्पाचं लक्ष विचलित झाल्यानंतर तुळशीने गणपतीकडे लग्नाचा प्रस्ताव ठेवला. परंतु गणपतीने सांगितलं की मी तुज्याशी लग्न करु शकत नाही. हे ऐकून तुळशीने बाप्पाला शाप दिला की तुज्या दोन पत्नी असतील.

गणपतीनेही दिला शाप :

तुळशीने जेव्हा गणपतीला शाप दिला तेव्हा गणपतीनेही तुळशीला शाप दिला की, तुझा विवाह एका राक्षसासोबत होईल. हे ऐकून तुळशीने क्षमायाचना केली तेव्हा गणपतीने उःशाप दिला की तू कृष्ण आणि विष्णूला प्रिय असल्याकारणाने कलियुगात जीवन आणि मोक्ष देणारी म्हणून तुझा गवगवा होईल. परंतु माज्या पूजेत तुळस चढवणं अशुभ मानलं जाईल. याकरताच आजही गणेशपूजनात तुळस वर्ज्य मानण्यात आली आहे.

# लग्न जमत नाही, मुल हवंय, आर्थिक तंगी आहे मग गणपतीला वहा ही फुले, मनोकामना होतील पूर्ण...!



शास्त्र असं सांगतं की, पूजेमध्ये फुलांना विशेष महत्त्व असतं. फुलं नसतील तर देवाची पूजा अपूर्ण मानली जाते. असं म्हणतात की फुलं वाहिली की देव लवकर प्रसन्न होतो. कोणतीही पूजा सुरू करण्याआधी आपण गणपतीची पूजा करतो. गणपतीला आवडणारे फुल म्हणजे जास्वंद. गणेश चतुर्थीच्या दिवसांमध्ये बाप्पाला आवडती फुलं वाहिली तर बाप्पा प्रसन्न होतो. बाप्पाची कृपा मिळवण्यासाठी व आपल्या मनोकामनापूतीर्साठी त्यांना कोणती फुलं वाहायची ते आपण पाहूया.

गणेश चतुथीर्ला बाप्पाला वाहा ही 5 फुलं होतील मनोकामना पूर्ण

1) झेंडूचं फूल : गणपती बाप्पाला झेंडूचं फूल खूप आवडतं. बाप्पाच्या पूजेत हे फूल नेहमी वापरतात. असं मानलं जातं की झेंडूचं फूल बाप्पाला वाहिले तर आरोग्य चांगलं राहतं. सोबतच आर्थिक अडचणी पण दूर होतात.

2) जास्वंदीचं फूल : गणपतीला जास्वंदीचं फूल वाहिले तर माणूस आपल्या शत्रूंवर विजय मिळवतो. त्याच्या आयुष्यात भरभराट येते. बाप्पा आपल्या भक्तांचे सगळे कष्ट दूर करतो.



3) पारिजातकाचं फूल : पारिजातकाचं फूल गणपतीला खुप आवडतं. ज्या लोकांना मूल हवं आहे त्यांनी हे फूल बाप्पाला नक्की वाहावं. असं मानतात की, त्यामुळे मूल होण्यात येणाऱ्या अडचणी दूर होतात.

4) निशिगंध फूल : गणपतीला निशिगंधाचे फूल वाहिले, तर घरात सुख-शांती नांदते. कुटुंबात प्रेम वाढतं, नात्यांमध्ये गोडवा येतो असे मानले जाते.



5) अपराजिताचं फूल : ज्या लोकांच्या लग्नात अडचणी येत आहेत त्यांनी गणपतीला अपराजिताचं फूल वाहावं. असं केल्याने त्यांच्या लग्नाच्या इच्छा पूर्ण होतात.

गणपती बाप्पाला लाल रंगाची फुलं खूप आवडतात. पण काही फुलं त्यांना आवडत नाहीत जसं की तुळस. तुळस विष्णू देवाला प्रिय आहे त्यामुळे ती गणपतीला वाहु नये. त्याचप्रमाणे, सुकलेली फुलं पण देवाला वाहु नये.

# गणेशमूर्तींचा बोटीने प्रवास, भिवंडीकरांचा कोंडीवर उपाय

■भिवंडी। प्रतिनिधी,

वाहतूक कोंडीचे विघ्न बाप्पांच्या मार्गातही येत आहे. वाहतूक कोंडीचा त्रास ठाणे जिल्ह्यातील सर्वसामान्यांसह गणेशमूर्ती आगमण मिरवणूकीवरही दिसून येत आहे. भिवंडी तालुक्याच्या सीमेवर राहणाऱ्या गावकऱ्यांनी त्यांच्या गणेशमूर्ती बोटीतून घरी आणल्या आहेत. वाहतुक कोंडी आणि खराब रस्ते या दोन प्रमुख कारणांमुळे हा निर्णय घेतल्याचे गावकऱ्यांनी सांगितले. ठाणे, भिवंडी, कल्याण शहरात



मोठ्या प्रमाणात खड्डे पडले असून नागरिक बेजार झाले आहे. या भागातून अवजड वाहनांच्या वाहतूकीमुळे कोंडीत भर पडते.भिवंडी तालुक्यातून ठाणे, कल्याणला कामानिमित्त जाणाऱ्या नागरिकांना वेळेत कामावर पोहचणे कठीण झाले आहे. शालेय विद्यार्थ्यांनाही त्याचा फटका बसत आहे. भिवंडीतील अनेक गणेशमूर्ती मिरवणूका वाहतुक कोंडीत अडकल्या होत्या. त्यामुळे तालुक्यातील सीमेवरील नांदकर, ईताडे आणि सांगे या गावातील सुमारे ७० ते ७५ घरगुती गणपतींचा प्रवास बोटीतून झाला. दरवर्षी कल्याण, गंधारी, बापगाव ते नांदकर या मार्गे गावात मिरवणूका काढत गणेशमूर्ती आणल्या जातात. भिवंडी तालुक्यातील नागरिकांवर यावर्षी चक्क काळू नदीतून बोटीद्वारे गणेशमूर्ती आणण्याची वेळ आली. "भिवंडी तालुक्यात अनेक ठिकाणी रस्त्यांवर खड्डे पडले आहेत. त्यामुळे खड्डे आणि कोंडी टाळण्यासाठी आम्ही गणेशमूर्ती प्रवासी बोटीने आणण्याचे ठरविले होते. त्यानुसार गावातील गणेशमूर्ती बोटीने आणल्या" अशी माहिती मनोज पाटील, माजी उपसरपंच, नांदकर यांनी दिली.

# विरार–डहाणू चौपदरीकरणाचे काम रुळावर; २०० लोकल फेऱ्या वाढणार

■मुंबई। प्रतिनिधी:

मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशनच्या (एमआरव्हीसी) माध्यमातून विरार-डहाणू चौपदरीकरणाचे काम सुरू असून, रूळ बसविण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. आत्तापर्यंत प्रकल्पाचे ४१ टक्के काम झाले आहे. ते २०२७ पर्यंत पूर्ण करण्याचे एमआरव्हीसीचे लक्ष्य आहे. नव्या मार्गिकेमुळे लोकलच्या २००हून अधिक फेऱ्या वाढतील, असा दावा केला जात आहे. सध्या चर्चगेट ते डहाणूदरम्यान दिवसभरात ६ ते ७ थेट गाड्या धावतात. चौपदरीकरणानंतर विरार-डहाणू दरम्यानच्या सेवा तसेच संपूर्ण मार्गावर २०० पेक्षा अधिक सेवा चालविल्या जाऊ शकतात, अशी माहिती रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी दिली. जमिनीचे सपाटीकरण आणि ब्लँकेटिंगच्या कामानंतर, आता केळवे - पालघरदरम्यान रूळ बसविण्याचे काम सुरू झाले आहे. या मार्गावरून ताशी १६० किमी वेगाने गाडी धावणार आहे. विरार - डहाणू भागात वाढत्या शहरीकरणामुळे गर्दीच्या तुलनेत कमी सेवा चालविल्या जातात. ही मार्गिका तयार झाल्यावर प्रवाशांना दिलासा मिळू शकेल. मुंबई अर्बन ट्रान्सपोर्ट प्रोजेक्ट-३ अंतर्गत सुरू असलेल्या या प्रकल्पासाठी ३ कोटी ५७८ कोटी रुपये मंजूर केले आहेत.

पश्चिम रेल्वेच्या विरार आणि डहाणू रोड दरम्यानच्या सध्याच्या दुहेरी मार्गावर उपनगरीय, मालवाहतूक आणि एक्स्प्रेस गाड्यांचा भार अधिक आहे. त्याचा परिणाम रेल्वेच्या कार्यक्षमतेवर होतो. शिवाय, या भागातील रेल्वे फेऱ्यांमध्ये वाढ करण्यातही अडचणी येत होत्या. या नव्या मार्गिकांमुळे प्रवाशांची अनेक वर्षांची मागणी पूर्ण होणार आहे. विरार ते डहाणू आणि चर्चगेट ते डहाणूदरम्यान सेवांची वाढ करण्यास मदत होणार आहे.

# कुख्यात लॉरेन्स बिष्णोई टोळी मुंबईत सक्रिय, व्यावसायिकाला २५ लाखांच्या खंडणीसाठी धमकी

■मुंबई। प्रतिनिधी:

कुख्यात गुंड लॉरेन्स बिष्णोई गणेशोत्सव काळात मुंबईत सक्रिय झाला आहे. गोरेगावमधील एका मोठ्या बांधकाम व्यावसायिकाला २५ लाखांच्या खंडणीसाठी विष्णोई टोळीतील एका गुंडाने फोन केला आहे. खंडणी न दिल्यास कुटुंबाला ठार मारण्याची धमकी या गुंडाने दिली. याप्रकरणी गोरेगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हे शाखा या प्रकरणाचा समांतर तपास करीत आहे. गणेशोत्सव काळात मुंबई पोलिसांनी कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी कंबर कसलेली असताना कुख्यात गुंड लॉरेन्स बिष्णोई टोळीच्या



गुंडाने खंडणीसाठी केलेल्या फोनने खळबळ उडाली आहे. लॉरेन्स बिष्णोई टोळीने नुकतीच हास्यअभिनेता कपिल शर्मा याच्या कॅनडामधील कॅफेवर गोळीबार केला होता. त्याच्या तपासाचे धागेदोर जुळवत असताना या नव्या फोनने पोलिसांची चिता वाढवली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या टोळीतील एका गुंडाने गोरेगावमध्ये राहणाऱ्या एका मोठ्या व्यावसायिकाला खंडणीसाठी फोन केला आहे. फोन करणाऱ्या गुंडाने २५ लाख रुपये आणि १ किलो सोन्याची मागणी केली आहे. ही मागणी पूर्ण केली नाही, तर व्यावसायिकासह संपूर्ण कुटुंबाला मारण्याची धमकी दिली आहे. घाबरलेल्या व्यावसायिकाने या प्रकरणी गोरेगाव पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार केली. त्या तक्रारीनुसार अज्ञात व्यक्ती विरोधात भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमाअंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. गुन्हे शाखा या प्रकरणाचा तपास करीत आहे. धमकी देणाऱ्या व्यक्तीची अद्याप ओळख पटलेली नाही. मात्र त्याने लॉरेन्स बिष्णोई टोळीचे नाव घेतल्याने आम्ही या प्रकरणाकडे गांभियार्ने पाहत असल्याचे एका वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने सांगितले.

लॉरेन्स बिष्णोई हा हरियाणातील कुख्यात गँगस्टर असून पंजाब, हरियाणा, राजस्थान, दिल्ली आणि इतर उत्तरेकडील राज्यांमध्ये सक्रिय असलेल्या बिष्णोई गँगचा तो प्रमुख मानला जातो. अभिनेता सलमान खानला दिलेली धमकी आणि त्याच्या घरावर केलेल्या गोळीबारामुळे तो चर्चेत आला होता. पंजाबी गायक सिद्धू मूसेवाला याच्या २०२२ मध्ये झालेल्या हत्येचा सूत्रधार म्हणून लॉरेन्स बिष्णोईचे नाव चर्चेत आले.

# परतीच्या प्रवासासाठी कोकणातून विशेष रेल्वेगाडी धावणार



■मुंबई। प्रतिनिधी:

गणेशोत्सव काळात होणारी प्रवाशांची गर्दी लक्षात घेऊन विशेष रेल्वेगाड्या सोडण्यात येत आहेत. तर, गणेश विसर्जनानंतर कोकणातून मुंबईला येणाऱ्या प्रवाशांची मोठी संख्या लक्षात घेऊन विशेष रेल्वेगाडी सोडण्यात येणार आहे. चिपळूण - पनवेल मेमू अनारक्षित रेल्वेगाडीमुळे प्रवाशांना दिलासा मिळेल. भारतीय रेल्वे गणेशोत्सवानिमित्त ३८० विशेष रेल्वेगाड्या चालवत आहे. कोकण विभाग आणि उर्वरित महाराष्ट्रातून मध्य रेल्वेने एकूण ३१० गणपती विशेष रेल्वेगाड्या सोडल्या आहेत. गणेशोत्सव सुरू झाला असून गणेश विसर्जनासाठी कोकणातून मोठ्या संख्येने प्रवासी परतीचा प्रवास सुरू करतील. त्यामुळे मुंबई येणाऱ्या प्रवाशांची गर्दी लक्षात घेऊन कोकणातून विशेष रेल्वेगाडी चालविण्यात येणार आहे. गाडी क्रमांक ०११६० चिपळूण - पनवेल मेमू अनारक्षित विशेष रेल्वेगाडी चिपळूण येथून ३ आणि ४ सप्टेंबर रोजी सकाळी ११.०५ वाजता सुटेल. ही रेल्वेगाडी त्याच दिवशी दुपारी ४.१० वाजता पनवेल येथे पोहचेल. गाडी क्रमांक ०११५९ पनवेल - चिपळूण मेमू अनारक्षित विशेष रेल्वेगाडी पनवेल येथून ३ आणि ४ सप्टेंबर रोजी दुपारी ४.४० वाजता सुटेल, ही रेल्वेगाडी त्याच दिवशी रात्री ९.५५ वाजता चिपळूण येथे पोहचेल. या रेल्वेगाडीला अंजनी, खेड, कळंबणी बुद्रुक, दिवाणखवटी, विन्हेरे, करंजाडी, सापे वामणे, वीर, गोरेगाव रोड, माणगाव, इंदापूर, कोलाड, रोहा, नागोठणे, कासू, पेण, जिते, आपटा आणि सोमाटणे या रेल्वे स्थानकावर थांबा असेल. या रेल्वेगाडीला ८ मेमू डबे असतील. गाडी क्रमांक ०११३१ द्वैसाप्ताहिक विशेष रेल्वेगाडी प्रत्येक गुरुवारी आणि रविवारी म्हणजे ३१ ऑगस्ट, ४ सप्टेंबर आणि ७ सप्टेंबर रोजी लोकमान्य टिळक टर्मिनस येथून सकाळी ८.४५ वाजता सुटेल आणि त्याच दिवशी रात्री १०.२० वाजता सावंतवाडी रोड येथे पोहोचेल. तर, गाडी क्रमांक ०११३२ द्वैसाप्ताहिक विशेष रेल्वेगाडी प्रत्येक गुरुवारी आणि रविवारी ३१ ऑगस्ट, ४ सप्टेंबर आणि ७ सप्टेंबर रोजी सावंतवाडी रोड येथून रात्री ११.२० वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी दुपारी १२.३० वाजता लोकमान्य टिळक टर्मिनस येथे पोहोचेल.

या रेल्वेगाडीला ठाणे, पनवेल, पेण, रोहा, माणगाव, खेड, चिपळूण, सावर्डा, आरवली रोड, संगमेश्वर रोड, रत्नागिरी, आडवली, विलवडे, राजापूर रोड, वैभववाडी रोड, नांदगाव रोड, कणकवली, सिंधुदुर्ग, कुडाळ आणि झाराप येथे थांबा देण्यात आला आहे.

# रॅपिडो बाईक टॅक्सीवरील कारवाईच्या मागणीत जनहित काय? रिक्षाचालक संघटनेला उच्च न्यायालयाचा प्रश्न

■मुंबई। प्रतिनिधी:

मुंबई महानगर प्रदेशात विनापरवाना चालवल्या जाणाऱ्या रॅपिडो बाईक-टॅक्सीवरील कारवाईच्या मागणीसाठी रिक्षाचालकांनी मंगळवारी पुन्हा एकदा उच्च न्यायालयात धाव घेतली. तथापि, रिक्षाचालकांच्या हेतूवर बोट ठेवून त्यांच्या मागणीमागे जनहित काय ? असा प्रश्न न्यायालयाने केला. त्याचवेळी. मुंबई महानगर प्रदेशात बंदी असतानाही ही सेवा देणाऱ्यांवर आतापर्यंत काय कारवाई केली याचा तपशील सादर करण्याचे आदेश न्यायालयाने राज्य सरकारला दिले. रिक्षाचालक ग्राहकांना जी वागणूक देतात, त्यांच्याशी जे वर्तन करतात तो आणि त्यांचा उद्धटपणा आम्हाला चांगलाच ठाऊक आहे, अशा शब्दांत उच्च न्यायालयाच्या अन्य खंडपीठाने रॅपिडो बाईक टॅक्सीविरोधात याचिका करणाऱ्या रिक्षाचालकांचा समाचार घेतला होता. त्यानंतर, रिक्षा चालकांनी याचिका मागे घेतली होती. तथापि, रिक्षाचालकांच्या संघटनेने याच मागणीसाठी पुन्हा एकदा उच्च न्यायालयात धाव घेऊन जनहित याचिका दाखल केली आहे. मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे आणि न्यायमूर्ती संदीप मारणे यांच्या खंडपीठापुढे मंगळवारी ही जनहित याचिका सुनावणीसाठी आली. त्यावेळी, मुंबई महानगर प्रदेशात रॅपिडो टॅक्सी-बाईक विनापरवाना चालवल्या जात



आहेत. या टॅक्सींना सेवा देण्यावर बंदी घालण्यात आली आहे. असे असतानाही ही सेवा बिनदिक्कत सुरू आहे आणि त्यामुळे नागरिकांची सुरक्षा धोक्यात आली आहे, असे याचिकाकर्त्यांच्या वतीने न्यायालयाला सांगण्यात आले. तसेच, या बाईक-टॅक्सींवर जप्तीची कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. त्यावर, रॅपिडो बाईक टॅक्सीचा तुमच्या उपजीविकेवर कसा परिणाम होईल ? या बाईक-टॅक्सीवरील कारवाईने काय जनहित साधले जाणार आहे ? अशी विचारणा करून न्यायालयाने याचिकाकर्त्यांनी याचिका करण्यामागील हेतूबाबत प्रश्न उपस्थित केला. तसेच, नागरिकांकडून तुमच्या सेवेला नाकारले जाऊन या बाईक-टॅक्सीला निवडले जाणे हे तुमचे मूळ दुःख असल्याचेही न्यायालयाने याचिकाकर्त्यांना सुनावले. आम्हालाही नागरिकांच्या सुरक्षेची चिंता आहे. तथापि, या बाईक-टॅक्सींवर जानेवारी २०२३ च्या शासन निर्णयानुसार कारवाई केली जात असल्याचे सरकारी वकिलांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे, सरकार देखील तुमच्या बाजूने आहे. असे असताना ही याचिका करण्यामागील कारण काय? अशी विचारणा न्यायालयाने पुन्हा एकदा याचिकाकर्त्यांना केली. त्याचवेळी, आतापर्यंत या शासन निर्णयानुसार, किती विनापरवाना बाईक-टॅक्सींवर कारवाई केली याचा तपशील दोन आठवड्यांत सादर करण्याचे आदेश न्यायालयाने अतिरिक्त सरकारी वकील प्राची ताटके यांना दिले.

# मोनो रेल बिघाडप्रकरणी दोन अधिकारी निलंबित



■मुंबई। प्रतिनिधी:

मोनो रेल बंद पडल्यानंतर गाडीच्या काचा फोडून प्रवाशांची सुटका करावी लागलेल्या घटनेची एमएमआरडीएने गंभीर दखल घेतली आहे. या प्रकरणातील त्रुटी उघड झाल्यानंतर सिग्नल व दूरसंचार विभागाचे मुख्य अभियंता मनीष सोनी आणि सुरक्षा व्यवस्थापक राजीव गिते यांना निलंबित करण्यात आले आहे. तसेच, या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी एमएमआरडीएचे अतिरिक्त महानगर आयुक्त विक्रम कुमार यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली आहे.

मोनोरेल मार्गावर १९ ऑगस्टला गाडी बंद पडली होती. वडाळ्याकडून चेंबूरच्या दिशेने निघालेली असताना सायंकाळी ६:१५ वाजण्याच्या सुमारास मैसूर कॉलनी स्थानकाजवळ ती बंद पडली. दोन तास अडकून पडलेल्या प्रवाशांना अग्निशमन दलाच्या मदतीने बाहेर काढण्याची वेळ महामुंबई मेट्रो संचलन मंडळावर आली होती. घटनेत गुदमरल्याने १६ प्रवाशांना श्वसनाचा त्रास झाला. त्यापैकी १३ प्रवाशांना १०८ रुग्णवाहिकेतील डॉक्टरांनी घटनास्थळी उपचार करून घरी सोडले, तर ३ जणांना रुग्णालयात दाखल करण्यात आले.

एमएमआरडीएने या घटनेची प्राथमिक चौकशी केली होती. त्यानंतर महानगर आयुक्त डॉ. संजय मुखर्जी यांनी घटनेच्या दिवशी प्रवाशांच्या सुटकेसाठी वापरण्यात आलेल्या मानक कार्यपद्धतीची (एसओपी) मंगळवारी तपासणी केली. त्यामध्ये दोन अधिकाऱ्यांनी गंभीर चुका केल्याचे उघड झाले. आता मोनोच्या सुरक्षेची जबाबदारी एमएमआरडीएच्या मुख्य सुरक्षा अधिकाऱ्यांवर सोपविण्यात आली. घटनेनंतर पोलीस आणि पालिका प्रशासनाशी समन्वय साधण्यात त्रुटी राहिल्या. उपाययोजना राबविण्याची जबाबदारी मुख्य अभियंत्याची असतानाही ते घटनास्थळी विलंबाने आले. मोनो स्थानकांच्या पाहणीतही सुरक्षा अधिकाऱ्यांनी त्रुटी ठेवल्या.

# वांद्रे रिक्लेमेशनजवळील भूखंड अदानीला देण्याचा मार्ग मोकळा

■मुंबई। प्रतिनिधी:

वांद्रे रिक्लेमेशन परिसरातील सीआरझेडमध्ये येणारा भूखंड व्यावसायिक क्षेत्र म्हणून विकसित करण्याच्या व तो अदानी रियल्टीला उपलब्ध करून देण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या दोन जनहित याचिका उच्च न्यायालयाने मंगळवारी फेटाळल्या. त्यामुळे संबंधित भूखंड राज्य सरकारला अदानी रियल्टीला देण्याचा मार्ग मोकळा झाला. सीआरझेड नियमावलीनुसार, भराव टाकून केलेल्या भूखंडावर विकासकामांना परवानगी देता येत नाही. सीआरझेड परिसरातील भूखंड विकसित करण्यावर निर्बंध असूनही एमएसआरडीसीने जानेवारीत हा भूखंड व्यावसायिक क्षेत्र म्हणून विकसित करण्यासाठी निविदा काढली. या निर्णयाला पर्यावरणप्रेमी झोरू बाथेना व स्थानिकांच्या एका संघटनेने



उच्च न्यायालयात आव्हान दिले. सीआरझेडच्या नियमांचे पालन करण्यात यावे. तसेच या भूखंडावर कोणत्याही विकासास प्रतिबंध करण्याचे आणि या जागेला हरितपट्टा म्हणून पुनर्संचित करावे, अशी मागणी याचिकाकर्त्यांनी केली होती. वांद्रे- कुर्ला संकुलासाठी १९७० मध्ये समुद्रात भराव टाकून जागा तयार केली गेली. त्यात भराव न टाकलेली जागा वांद्रे रिक्लेमेशन म्हणून ओळखली जाते. वांद्रे-वरळी सागरी सेतू बांधण्यासाठी पर्यावरण मंत्रालयाची परवानगी घेण्यात आली.

# नामांकित सराफ दुकानाच्या नावाचा गैरवापर; मुंबईतील दोन कंपन्यांची लाखोंची फसवणूक

■मुंबई। प्रतिनिधी:

पुण्यातील प्रसिध्द सराफ दुकानाच्या नावाने मुंबईतील सोन्याचे दागिने घडवणाऱ्या दोन कंपन्यांची ३१ लाख रुपयांची फसवणूक करण्यात आली आहे. याप्रकरणी एमएआयडीसी पोलिसांनी कार्तिक शाह नावाच्या आरोपीला अटक केली आहे. शाह याने नामांकित सराफ दुकानाचे जीएसटीचे प्रमाणपत्र मिळवले आणि त्याचा गैरवापर करून फसवणूक केली. एमआयडीसी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कार्तिक शाह (३३) हा आरोपी बोरीवलीत राहतो. त्याने काही वर्षं सराफाच्या दुकानात काम केलेले आहे. त्यामुळे त्याला या व्यवसायातील बारकावे आणि सखोल माहिती आहे. या माहितीच्या आधारे त्याने फसवणूक करण्यासाठी अनोखी





शक्कल लढवली.

दिशाभूल करून जीएसटी प्रमाणपत्र मिळवले.

कार्तिक शाह ८ ऑगस्ट रोजी पुण्यातील एका प्रसिद्ध सोने-चांदीच्या दागिन्यांच्या दुकानात गेला. मी आंतराष्ट्रीय हिरे परिक्षण संस्थेचा (इंटरनॅशनल जेमोलॉजिकल इन्स्टिट्यूट) अधिकारी असल्याचे त्याने सांगितले. त्यानंतर त्याने व्यवस्थापकाकडे त्याने वस्तू सेवा कर (जीएसटी) प्रमाणपत्र अद्ययावत करण्याच्या बहाण्याने प्रमाणपत्राची प्रत मागितली. त्याच्या देहबोलीवरून कुणाला संशय आला नाही. त्यामुळे त्याला व्यवस्थापकाने जीएसटी प्रमाणपत्राची प्रत दिली. संबंधित दुकानाचे जीएसटी प्रमाणपत्र हाती आल्याने शाह याने पुढची खेळी केली. या प्रमाणपत्राचा वापर त्याने फसवणुकीसाठी केला. दुसऱ्याच दिवशी ९ ऑगस्ट रोजी शाहने मुंबईतील मनी ज्वेल्स एक्स्पर्ट विथ बेटर डायमंड आणि कॅलिस्टा ज्वेलर्स या सोन्याचे दागिने तयार करणाऱ्या कंपन्यांशी संपर्क साधला. संबंधित दुकानाचे नाव वापरून दोन नवी शोरूम उघडत असून तेथे ठेवण्यासाठी दागिने लागणार असल्याचे सांगितले. कंपन्यांचा विश्वास बसावा यासाठी जीएसटी प्रमाणपत्राची प्रत पाठवली. त्यामुळे कंपनीचा विश्वास बसला. त्याने कंपन्यांना दागिने पार्सल पोर्टरमार्फत पाठविण्यास सांगितले आणि मुंबई व पुण्यातील वेगवेगळे पत्ते सांगितले. मात्र पोर्टर शोरूमच्या पत्त्यावर पोहोचण्यापूर्वीच शाहने बांद्रा येथे रस्त्यात गाठून त्याच्याकडून पार्सल घेतले. अशा प्रकारे शाहने दोन्ही कंपन्यांकडून ३१ लाख ५८ हजार रुपये किमतीचे सोन्याचे व हिऱ्याचे दागिने लंपास केले.

# सहा लाख हेक्टरवरील पिकं अतिवृष्टीमुळे पाण्यात



■अमरावती। प्रतिनिधी:

यंदाच्या सततच्या पावसामुळे व अतिवृष्टीमुळे पश्चिम विदभार्तील तब्बल ६.०८ लाख हेक्टरमधील तूर, कपाशी, सोयाबीन, संत्रा व भाजीपाला पिके बाधित झाल्याचा अहवाल कृषी सहसंचालक कार्यालयाने दिला आहे. एकट्या ऑगस्ट महिन्यातच ४.५८ लाख हेक्टरमध्ये नुकसान झालेले आहे. त्यातच पुढील चार दिवस हवामान विभागाने 'येलो अलर्ट' जाहीर केल्याने शेतकऱ्यांची चिंता आणखी वाढली आहे. जून महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे १,०८,९१३ शेतकऱ्यांच्या ९८,२०९ हेक्टरमधील पिकांचे नुकसान झाले. यासाठी एनडीआरएफच्या निकषाने ८८.२३ कोटींच्या निधीची मागणी शासनाकडे करण्यात आलेली आहे. यामध्ये सर्वाधिक ८७,३९० हेक्टरमध्ये नुकसान बुलढाणा जिल्ह्यात झालेले आहे. जुलै महिन्यात २०४ शेतकऱ्यांच्या ५२,९२९ हेक्टरमधील पिकांचे नुकसान झाले. यामध्ये सर्वाधिक ३१,५४२ हेक्टरमध्ये नुकसानदेखील बुलढाणा जिल्ह्यातील आहे. पश्चिम विदर्भात यवतमाळ व वाशिम जिल्हा वगळता अमरावती अकोला व बुलढाणा जिल्ह्यात पावसाने अद्याप सरासरी गाठलेली नाही. तरीही ऑगस्ट महिन्यात पावसाची सरासरी १५ टक्के तूट भरून निघाली. 'महावेध'च्या अहवालानुसार, विभागात आतापर्यंत ५८१.५ मिमी पावसाची सरासरी अपेक्षित असताना ५७८.५ मिमी पाऊस झालेला आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मंदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com